# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:13.03.2026** **वार: शुक्रवार**

1. पंतप्रधान आज प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या बविसाव्या हप्त्याचं वितरण करणार
2. शेती आणि अन्न प्रणालीत महिलांची भूमिका महत्त्वाची असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
3. देशात घरगुती एलपीजीचा पुरवठा पूर्णपणे सुरक्षित असल्याचा केंद्र सरकारचा पुनरुच्चार आणि
4. घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी राज्यभर जिल्हास्तरीय समित्या स्थापन

**प्रधानमंत्री शेतकरी सन्मान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आसाममधील गुवाहाटी इथून प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा 22वा हप्ता वितरित करणार आहेत. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. पंतप्रधानांच्या हस्ते 18 हजार 640 कोटी रुपये देशातल्या 9 कोटींहून अधिक पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा केले जातील असंही त्यांनी सांगितलं. या योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत 4 लाख 27 हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आल्याचंही कृषीमंत्र्यांनी सांगितलं.

**राष्ट्रपती**

कृषी आणि कृषी अन्न प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी म्हटलं आहे. शेती आणि अन्न प्रणालीत महिलांची भूमिका या विषयावर नवी दिल्ली इथं आयोजित आंतरराष्ट्रीय परिसंवादाला त्या काल संबोधित करत होत्या. धोरण निर्मिती आणि निर्णय प्रक्रियेत कृषी क्षेत्रातील महिलांचा सहभाग वाढायला हवा असं राष्ट्रपती म्हणाल्या. महाराष्ट्रातल्या बीजमाता राहीबाई पोपेरे यांच्या कार्याचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख आपल्या भाषणात केला...

**मछली पालन, मधुमक्खी पालन, पशुपालन, वन्य उपजों के समुचित उपयोग तथा कृषि पर आधारित उद्यमों को चलाने जैसे अनेक क्षेत्रों में हमारी माताएँ बहने और बेटियाँ अथक परिश्रम करती है। ये कृषि अर्थव्यवस्था को अमूल्य योगदान देते हैं। महाराष्ट्र के एक जनजातीय समुदाय के आने वाले श्रीमती राहीबाई सीमा पोपरे जी ने विभिन्न फसलों की प्रजातियों का संरक्षण किया है। उन्हें सीड मदर के नाम में जाना जाता है। मैं चाहूँगी ऐसी महिलाओं से प्रेरणा प्राप्त करके भावी पीढ़ी की बेटियों भी कृषि के क्षेत्रों में योगदान देंगे।**

**हरदीप सिंग पुरी**

देशात कच्च्या तेलाचा पुरवठा सुरळीत सुरू असून घरगुती एलपीजीचा पुरवठा पूर्णपणे सुरक्षित असल्याचा पुनरुच्चार केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी केला आहे. पश्चिम आशियातील संघर्षामुळे, जागतिक ऊर्जा पुरवठ्यात निर्माण झालेल्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर, सरकारनं केलेल्या उपाय योजनांबाबत पुरी यांनी काल लोकसभेत निवेदन दिलं.

घरगुती एलपीजीचा पुरवठा पूर्णपणे सुरक्षित असून घरगुती गॅस सिलिंडरची नोंदणी केल्यानंतर वितरण होण्यासाठी लागणारा कालावधी पूर्वीप्रमाणेच अडीच दिवसांचा आहे. देशातील 33 कोटी कुटुंबांना, प्रमुख्यानं गरीब आणि वंचित घटकांना, अखंडित एलपीजी पुरवठा करण्याला सरकारचं प्राधान्य आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

हरदीपसिंह पुरी लोकसभेत निवेदन करत असताना विरोधी पक्षांच्या सदस्यांनी घोषणाबाजी करत गोंधळ घातला. रशियाकडून 30 दिवसांसाठी तेल खरेदीची परवानगी अमेरिकनं भारताला दिल्याच्या मुद्द्यावरुन लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी टीका केली. दरम्यान लोकसभेत काल चालू आर्थिक वर्षांसाठीच्या पूरवणी अनुदान मागणीवर चर्चा झाली.

**नियंत्रण कक्ष**

राज्यात घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत, आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनानं जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसंच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगानं आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश अन्न आणि  नागरी पुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत. घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, अशी ग्वाही अन्न आणि नागरी पुरवठा विभागानं दिली आहे.

गेल्या सहा महिन्यांच्या तुलनेत मार्च महिन्यामध्ये अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. रुग्णालयं, शासकीय वसतिगृहं, शासकीय शाळा-महाविद्यालयांमधील खानावळी, मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा आदी अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्थांना गॅसचा प्राधान्यानं पुरवठा करण्यात येणार असून अशा संस्थांची यादी प्रसिध्द करण्यात येणार असल्याचं राज्य शासनानं कळवलं आहे.

**तेलवाहू जहाज**

कच्च्या तेलाचं एक जहाज होर्मुजची सामुद्रधुनी ओलांडून काल मुंबईत सुरक्षित दाखल झालं. अमेरिका आणि इराण संघर्ष सुरू झाल्यानंतर या मार्गानं भारतात हे पहिलंच तेलवाहू जहाज दाखल झालं आहे. 1 लाख 35 हजार 335 मेट्रिक टन कच्चं तेल वाहून नेणारं हे जहाज मुंबई बंदरातील जवाहर द्वीप इथं पोहोचल्याची माहिती मुंबई बंदर प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

**यशवंतराव चव्हाण**

राज्याचे पहिले मुख्यमंत्री दिवगंत यशवंतराव चव्हाण यांच्या 113व्या जयंतीनिमित्त काल राज्यात सर्वत्र त्यांना अभिवादन करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवनात तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाज माध्यमावरच्या संदेशातून यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी कराड इथल्या प्रीती संगमावर जाऊन चव्हाण यांच्या समाधीचं दर्शन घेऊन त्यांना आदरांजली वाहिली. दरम्यान, यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त सांगली जिल्ह्यातल्या कडेगाव तालुक्यातील देवराष्ट्रे इथं, त्यांच्या जन्म घरी काल यशवंत कवी संमेलनाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी मुंबईच्या यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीनं दिव्यांगाना श्रवण यंत्रं देण्यात आली.

**विधीमंडळ**

राज्याच्या अर्थसंकल्पातील गृह, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध विकास, मत्स्य व्यवसाय, जलसंपदा, यासह नऊ विभागांच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा होऊन त्या काल विधानसभेत मंजूर करण्यात आल्या. या चर्चेच्या वेळी विरोधी पक्षाच्या आमदारांनी राज्यातल्या कायदा आणि सुव्यवस्थेवरून सरकारवर टीका केली.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयं आणि रुग्णालयांमध्ये औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असून रुग्णांना बाहेरची औषधं लिहून दिल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल असं वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी काल विधान परिषदेत सांगितलं. प्रश्नोत्तराच्या तासात अमोल मिटकरी यांनी याविषयीचा प्रश्न उपस्थित केला होता.

हवामान बदलाच्या दृष्टीनं महाराष्ट्र हे देशातल्या सर्वाधिक संवेदनशील पाच राज्यांपैकी एक आहे. 2025 हे वर्ष दशकभरातलं सर्वात उष्ण वर्ष ठरलं, अशी माहिती राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी काल विधानपरिषदेत दिली. सदस्य सुनील शिंदे यांनी याविषयी चर्चा उपस्थित केली होती.

जमिनीला लागून असलेल्या घरांचाच समावेश झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत असल्यानं मुंबई शहरात झोपड्यांच्या वरच्या मजल्यावरल्या झोपडीधारकांना पात्र ठरवता येणार नाही, असं मंत्री शंभुराज देसाई यांनी स्पष्ट केलं. ते काल विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होते. पोटमाळा किंवा वरच्या मजल्यावर राहणाऱ्यांना योजनेचा लाभ देता येणार नाही असं देसाई यांनी सांगितलं.

मुंबईतल्या उंच इमारतींसाठी अग्निसुरक्षा व्यवस्था सक्षम करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत दिली. पुणे शहरातील हॉटेल्स, उपाहार गृहं, आणि खाद्यपदार्थ विक्री केंद्रावरच्या तपासण्या अन्न आणि औषध प्रशासनानं वाढवाव्यात, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी काल विधानसभेत केली. यावर उपाहार गृहांमधील तपासण्या वाढवण्याचं आश्वासन अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी दिलं.

**<u>जिल्हा परिषद-रायगड</u>**

रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाची निवडणूक बिनविरोध झाली आहे. अध्यक्षपदी भाजपचे मंगेश वाकडीकर तर उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे मधुकर पाटील यांची निवड झाली आहे.

**<u>बिबट्या-अहिल्यानगर</u>**

अहिल्यानगर जिल्ह्यात, पारनेर तालुक्यातील सावता वडगाव इथं वन विभागाच्या नर्सरीत 3 महिन्यापासून बंदिस्त असलेल्या 20 बिबट्यांना जुन्नर मधल्या बिबट निवारा केंद्रात स्थलांतरित करण्यात आलं, तर एका बिबट्याला निसर्गात मुक्त सोडण्यात आलं आहे. या बिबट्यांच्या पुनर्वसनासाठी जीवदया फाउंडेशनच्या माध्यमातून केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्यात आला होता.

**<u>कृषीकुंभ-नाशिक</u>**

नाशिकमध्ये काल कृषी कुंभचं उद्घाटन राज्य शासनाच्या कृषी पुरस्कार प्राप्त महिला शेतकऱ्यांच्या हस्ते करण्यात आलं. तंत्रज्ञानाचा वापर हाच शेतकऱ्यांचा समृद्धीचा मार्ग आहे, असं प्रतिपादन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी यावेळी केलं.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या बहुतांश भागात कमाल तापमानात सध्या वाढ होत असून, काल काही ठिकाणी लक्षणीय वाढ नोंदवण्यात आली. राज्यात काल सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं 41 अंश सेल्सिअस होत. येत्या 24 तासात कोकणात तुरळक ठिकाणी उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे; तर विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**